**म.सं.कौ.हि.का.अर्ज ३६/२०२४**

**निशाणी क्र.४०**

**<u>सामनेवाला क्र.१ ते ३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.बी.घोगरे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु–</u>**

**०८.** हे खरे की, जाबदेणार क्र.१ चे वडिल हे आमचे जुने नातेवाईक आहेत. हे खरे की, जाबदेणार क्र.१ चे पदवी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझी मुलगी व जावई हे लग्नानंतर तुळजापूर येथे राहत होते. ते लग्न झाल्यानंतर सहा महिने तुळजापूर येथे होते. हे खरे की, माझी मुलगी व जावई हे कर्जत येथे त्यांच्या कुटुंबासोबत राहिलेले नाहीत. दि.०३/०७/२०२४ रोजी माझ्या मुलीला जावयाने माहेरी आणून सोडले. माझ्या मुलीचे लग्न दि.०८/०१/२०२४ ला झाले होते. तुळजापूर येथे माझा जावई हा पेरु विकायचे काम करायचा. मी माझ्या मुलीकडे तुळजापूरला केवळ एकदा गेले होते. मला तुळजापूरला कधी गेले होते ती तारीख व वार सांगता येणार नाही. हे खरे नाही की, मी माझ्या मुलीकडे तुळजापूरला गेल्याचे खोटे सांगते.

**०९.** माझ्या मुलीने आशाबाई व राजेंद्र यांना या केसमध्ये का गुंतवले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, आशाबाई व राजेंद्र हे धार्मिक असुन ते दरवेळी पंढरपूर आळंदी येथे जातात. हे खरे नाही की, दि.२४/०७/२०२४ रोजी आम्ही सर्वजण भिगवण पोलिस ठाणेत गेलो होतो. हे खरे की, आम्ही आमच्या जावयाला मारहाण केली अशी माझ्या जावयाने भिगवण पोलिस ठाणेत तक्रार दिली आहे. हे खरे की, माझ्या मुलीने भिगवण पोलिस ठाणेत भा.द.वि. कलम ४९८–अ ची केस दाखल केली आहे. माझ्या मुलीला नांदायला पाठवायची माझी इच्छा आहे.

**१०.** हे खरे की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील संपूर्ण मजकूर माझ्या मुलीने सांगितला. साक्षीदार पुन्हा सांगतात मी सांगितला आहे. मी मुलीला नांदायला नेण्यासाठी जावयाला कोणतीही नोटीस पाठवलेली नाही. हे खरे की, माझ्या जावयाच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे खरे नाही की, सरतपासाच्या परिच्छेद क्र.५ मधील मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, माझा जावई पेरु विकण्याचे काम करतो हे मी मान्य केल्याने सरतपासाच्या परिच्छेद क्र.५ मधील मजकूर खोटा आहे. माझे आधार कार्डवरील वय ३९ आहे. हे खरे नाही की, माझ्या

मुलीच्या सासरच्या लोकांनी दोन लाखाची मागणी केल्याचे खोटे सांगतो. हे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केली. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.01.03 18:37:48 +0530

दि.०३/०१/२०२६

**(प्राजक्ता राजीव सबनीस),**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**

**ता.इंदापूर, जि.पुणे.**